सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२५/1249

दिनांक 28 APR 2025

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
तसेच सर्व बीबीए/बीबीएम/बीसीए अभ्यासक्रम चालविणा-या पदवी संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील SEBC/OBC/EWS संवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत..**

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१०७८ दिनांक ९.४.२०२५
२. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण//२०२५/११४५ दिनांक १६.०४.२०२५
३.या कार्यालचाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/११६७ दिनांक २१.०४.२०२५.
४. या कार्यालचाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/११६८ दिनांक २१.०४.२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संचालनालया अंतर्गत येत असलेल्या सर्व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयाव्दारे तपासणी करण्यात आलेल्या आहेत. तथापी गुणवत्ता यादी तपासणी करतेवेळी ज्या SEBC/OBC/EWS विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशास या कार्यालयाव्दारे मान्यता देण्यात आलेली नाही. त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा.उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णयामध्ये सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून SEBC/OBC/EWS प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी तीन महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मुदतवाढ देण्यात आलेली असल्याने अश्या विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ०७.०४.२०२५ पर्यंत आपणास प्राप्त झालेले असल्यास अश्या विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करण्यास संदर्भ १, २, ३ व ४ अन्वये कळविलेले आहे. त्यानुसार काही संस्थांनी अश्या विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलले आहे.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी जात वैधता प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रती या कार्यालयास सादर केलेल्या आहेत अश्या संस्थांनी विद्यार्थ्यांच्या मुळ जात वैधता प्रमाणपत्र व त्याची साक्षांकीत केलेली छायांकीत प्रतीसह **दिनांक ०२/०५/२०२५** रोजी **सकाळी ११.०० वाजता** संबंधित काम हाताळणा-या कर्मचा-यांनी या कार्यालयास उपस्थित राहावे.

**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत: प्रोग्रामर**, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.